# FORM G

## INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR FURURE CORPORATE RESOURCES PRIVATE LIMITED OPERATING AS INVESTMENT COMPANY AT MUMBAI, MAHARASHTRA

(Under sub-regulation (1) of regulation 36A of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

| SL. | RELEVANT PARTICULARS | |
|---|---|---|
| 1. | Name of the corporate debtor along with CIN No. | Future Corporate Resources Private Limited<br>CIN: U74140MH2007PTC175603 |
| 2. | Address of the registered office | Ground Floor, Shop No. 1, Laxmi Narayan Stationary, Prem Nagar, Opp. Meghwadi, Jogeshwari East, Mumbai - 400060, Maharashtra |
| 3. | URL of website | - |
| 4. | Details of place where majority of fixed assets are located | The Company was operating as group investment company and was also engaged in business activities of loyalty program, media releases, and telecom talk-time.<br>For further details write an email to irp.fcrpl@aegisipe.com. |
| 5. | Installed capacity of main products/ services | The company is not operational. |
| 6. | Quantity and value of main products/ services sold in last financial year | Nil |
| 7. | Number of employees/ workmen | Nil |
| 8. | Further details including last available financial statements (with schedules) of two years, lists of creditors are available at URL: | Expression of Interest is being invited for all assets except the excluded assets of the Corporate Debtor in terms of Regulation 36A and Regulation 36B(6A) of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016. For further details, write an email to irp.fcrpl@aegisipe.com. |
| 9. | Eligibility for resolution applicants under section 25(2)(h) of the Code is available at URL: | The resolution applicants must be eligible under Section 29A of the Insolvency and Bankruptcy Code, 2016.<br><br>For detailed EOI and eligibility criteria, please write an email to irp.fcrpl@aegisipe.com. |
| 10. | Last date for receipt of expression of interest | 03 December 2025 |
| 11. | Date of issue of provisional list of prospective resolution applicants | 06 December 2025 |

| | | |
|---|---|---|
| 12. | Last date for submission of objections to provisional list | 11 December 2025 |
| 13. | Date of issue of final list of prospective resolution applicants | 13 December 2025 |
| 14. | Date of issue of information memorandum, evaluation matrix and request for resolution plans to prospective resolution applicants | 13 December 2025 |
| 15. | Last date for submission of resolution plans | 12 January 2026 |
| 16. | Process email id to submit Expression of Interest | irp.fcrpl@aegisipe.com |

Date: 12 November 2025

Place: Mumbai

Aegis Resolution Services Private Limited
through authorised signatory Avil Menezes
As Resolution Professional of Future Corporate Resources Private Limited
Registration No. IBBI/IPE-0118/IPA-1/2022-23/50041
Authorisation for Assignment valid till 30 June 2026
Address: 106, Kanakia Atrium 2, Cross Road 'A',
Chakala MIDC, Andheri East, Mumbai – 400 093
Email: irp.fcrpl@aegisipe.com, avil@caavil.com

# हल्ला, लाल किल्ला आणि नोव्हेंबर महिना

**देशात** गेल्या सहा महिन्यांपासून दहशतवाद्यांच्या हालचालींना वेग आलेला होता. त्या दृष्टिकोनातून सुरक्षा यंत्रणांनी शोधमोहीम सुरू केलेली होती. अगदी महिनाभरापूर्वीच दोन अतिरेकी भारतात घुसल्याचाही सुगावा सुरक्षा यंत्रणांना लागलेला होताच. याशिवाय दोन दिवसांपूर्वी अहमदाबाद, फरीदाबाद, जम्मू-काश्मीर या ठिकाणी मोठमोठे शस्त्र साठे आणि आरडीएक्सचाही साठा सुरक्षा यंत्रणांच्या हाती लागला. यामध्ये सहभागी असलेल्या जवळपास तीन डॉक्टर्सनाही ताब्यात घेतले गेले होते. या संदर्भातला मजकूर आम्ही याच स्तंभातून काल लिहिला आणि ज्यामध्ये देशांतर्गत असलेल्या या धोक्याची गंभीरता व्यक्त केलेली होती. विशेषतः अहमदाबादमध्ये तिथल्या दहशतवाद विरोधी पथकाने केलेली कारवाई आणि त्याच्या पाठोपाठ दिल्लीत एका डॉक्टरला झालेली अटक या घटना ताज्या असतानाच त्याच दिवशी संध्याकाळी दिल्लीच्या लाल किल्ला परिसरामध्ये एका कारमध्ये स्फोट घडविला गेला. ज्यात जवळपास नऊ जणांचा बळी गेला. ही घटना दहशतवादी मॉड्यूल हे आता अधिक क्रियाशील झाल्याचे निदर्शक ठरते. गेल्या दहा वर्षांपासून या दहशतवादी हल्ल्यांना लगाम घालण्याचा प्रयत्न सुरक्षा यंत्रणांनी चालवला आहे. दहशतवाद्यांचे अनेक प्रयत्न उधळून लावण्यात यंत्रणांना यश आलेले होते. परंतु पाकिस्तानच्या माध्यमातून हे दहशतवादी पुन्हा सक्रिय झालेले पाहायला मिळतात. कारण ऑपरेशन सिंदूरनंतर दहशतवाद्यांचे बरेच मनसुबे उद्ध्वस्त झाले. विशेषतः पाकिस्तानमधली त्यांची मुख्य तळं ही अगदी नामशेष झाल्यासारखी आहेत. जैश- ए-मोहम्मद, लष्करे-तोयबा यासारख्या कट्टर दहशतवादी तळांचा थेट पाकिस्तानमध्ये घुसून केलेला नायनाट हा या सगळ्या दहशतवाद्यांच्या वर्मी बसलेला घाव होता आणि त्याच्या सुडापोटीच त्यांनी पुन्हा एकदा भारतात अस्थिरता माजवण्याची कारस्थाने सुरू केलेली आहेत. गेल्याच आठवड्यात पाकिस्तानमध्ये जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसुद अझर याने अगदी जाहीररित्या भारताविरुद्धची गरळ ओकली होती. त्यामध्ये महिलांनी या जिहादी चळवळीमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन केले होते.

### मोठ्या कटाची सुरुवात

विशेष म्हणजे या दिल्ली स्फोटाच्या संदर्भात एक महिला डॉक्टर शाहीनला अटक झालेली आहे आणि तिच्याकडे भारतातल्या महिला जिहादी गटाचे नेतृत्व सोपवले गेल्याची माहिती पोलीस तपासातून आता निष्पन्न होते आहे. या कारस्फोटाचा संबंध थेट पुलवामा हल्ल्यांमध्ये सहभागी असलेल्या काही दहशतवाद्यांशी जाऊन पोहोचतो. वापरली गेलेली कार जम्मू-काश्मीर, हरियाणा, दिल्ली अशा रूटने प्रवास करत आलेली होती आणि ती सुद्धा एका दहशतवादाचा सहानुभूतीदार असलेल्या व्यक्तीची कार असल्याचे आढळून आले. हा स्फोट आत्मघातकी पद्धतीने घडवला गेल्याचा संशय आहे. त्यामध्ये नेमकी कोणी महत्त्वाची भूमिका बजावली याचा कसून शोध सुरू झालेला आहे. सर्वात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, ही कार स्फोटकांनी भरलेली असावी आणि ती लाल किल्ला परिसरातच पार्किंग केली गेली. दहशतवाद्यांनी निवडलेले लाल किल्ल्याचे ठिकाण हे सुद्धा भविष्यातील मोठ्या कटाची सूचना देण्यासाठी निवडले गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तीन वर्षांपूर्वी काही आंदोलकांनी थेट लाल किल्ल्यात घुसून जो काही धुमाकूळ घातला होता तो सुद्धा विसरता येणार नाही. ज्यामध्ये प्रामुख्याने खलिस्तानवादी लोकांनी लाल किल्ल्यावर चढून अगदी तिरंग्याचाही अपमान करण्याचा प्रयत्न केला होता. पाच वर्षांपूर्वी लाल किल्ला परिसरातच शाहीन बाग आंदोलनही झालेले होते. अशा अनेक अर्थाने दहशतवाद्यांनी निवडलेली लाल किल्ल्याची जागा एकूण भारताच्या इतिहास आणि सध्याच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये सुद्धा विशेष महत्त्वाची ठरते. १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरून दिले जाणारे भाषण आणि लाल किल्ला ही भारताच्या स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित एक महत्त्वपूर्ण वास्तू ठरते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लाल किल्ला परिसरातच स्वतंत्र भारताचे पहिले ध्वजारोहण झाले होते. अशा एक ना अनेक संदर्भांचा विचार केला तर या दहशतवाद्यांनी हल्ल्यासाठी लाल किल्ल्याची निवड करून वेगवेगळा संदेश दिलेला आहे तो सुरक्षा यंत्रणांना दुर्लक्षित करता येणार नाही. लाल किल्ल्यापासून त्यांनी पुन्हा एकदा भारताला अस्थिर करण्याच्या कटाला सुरुवात केलेली असावी म्हणूनच अहमदाबाद, लखनौ आणि दिल्ली या तिन्ही शहरांना टार्गेट करण्याचा त्यांचा मूळ प्लॅन होता. त्यातल्या दिल्लीतला प्लॅन यशस्वी झालेला दिसतो. लखनौ आणि अहमदाबादमध्ये त्यांचे कट जरी उधळले गेले असले तरी भविष्यकाळामध्ये या दोन्ही शहरांचे धोके दुर्लक्षित करता येणार नाहीत. एवढेच नव्हे तर मुंबईसारख्या जागतिक दर्जाच्या शहरावरही या दहशतवाद्यांचे लक्ष असू शकते. म्हणूनच हा हल्ला झाल्यानंतर मुंबईत प्रचंड वेगाने सुरक्षा यंत्रणा तैनात केल्या गेल्या. मुंबईच्या सगळ्या प्रमुख ठिकाणांचे पोलीस संरक्षण वाढवले गेलेले आहे. बऱ्याच ठिकाणी तर मुंबईला पोलीस छावणीचे स्वरूप आल्याचे चित्र पाहायला मिळते. त्यातला आणखीन एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी पुन्हा एकदा नोव्हेंबर महिना निवडलेला दिसतो. २६ नोव्हेंबरचा मुंबईचा दहशतवादी हल्ला आणि आता १० नोव्हेंबरचा दिल्लीतला कारमधला बॉम्बस्फोट या गोष्टी सुद्धा दहशतवाद्यांच्या मोठ्या कटाच्या शृंखलेतला एक भाग ठरतो. म्हणूनच नोव्हेंबर महिना आणि लाल किल्ल्याची निवड हा दहशतवाद्यांच्या व्यापक कटाचा एक भाग ठरतो. यातून त्यांच्या भविष्यकाळातील मोठ्या दहशतवादी हल्ल्यांची शक्यता नाकारता येणार नाही.

### देशातल्या देशद्रोह्यांना ठेचा


अर्थातच दहशतवादी जर अजूनही पूर्वीच्या मानसिकतेत असतील तर त्यांची निराशा होण्याची शक्यता आहे. कारण दिल्लीतला बॉम्बस्फोट झाल्याबरोबर सुरक्षा यंत्रणांना एकत्रितपणे प्रचंड वेगाने कामाला लागल्यात आणि याच्याशी संबंधित अनेक ठिकाणांवर छापे घातले गेले आहेत. बऱ्याच जणांची धरपकड झालेली आहे. चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्यांच्या माध्यमातून या स्फोटाचा मूळ सूत्रधार कोण त्याचा पुढच्या दोन-चार दिवसांमध्ये उलगडा होऊ शकतो. पंतप्रधानांनी पुन्हा एकदा या स्फोटाची रचना करणाऱ्यांना कठोर धडा शिकवला जाईल अशा प्रकारचा निर्वाणीचा इशारा दिलेला आहेच. यानिमित्ताने एक गोष्ट अधोरेखित होते की, भारत पाकिस्तानात जाऊन तिथली दहशतवादी तळ उद्ध्वस्त करतो आहे. सर्जिकल स्ट्राईक असेल, एअर स्ट्राईक असेल या माध्यमातून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले जात आहे. पण त्याच समांतर पद्धतीने भारताच्या वेगवेगळ्या भागांमध्ये असलेली ही दहशतवाद्यांची आणि त्यांना सहानुभूती असणाऱ्यांची तळ देखील मुळासकट उखडून टाकण्याची आवश्यकता आहे. म्हणून देशांतर्गत या जिहादी मनोवृत्तीलाही पूर्णपणे संपवण्याची व्यापक मोहीम आखली गेली पाहिजे. आज जम्मू-काश्मीरमध्ये ही मनोवृत्ती संपण्यासाठी निकराचे प्रयत्न होत आहेत. देशाच्या इतर भागात असलेल्या या जिहादी देशद्रोह्यांना कायमचे संपवण्याचे व्यापक अभियान हे देखील भविष्यकाळातील दहशतवाद विरोधी लढ्याचा मोठा टप्पा राहिला पाहिजे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

क्षेत्र कोणतेही असो कष्टाला पर्याय नाही
आणि कष्टासोबत प्रामाणिकपणा असेल तर यशाला पर्याय नाही.

## पंचांग



**बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**कार्तिक कृष्ण अष्टमी**
**नक्षत्र : आश्लेषा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १८-३४ कर्क**
**१८-३५ ते २४-०० सिंह**

**रवी उदय- ०६-४५**
**रवी अस्त- १८-००**

**कालाष्टमी; कालभैरव जयंती; हरीहरेश्वर यात्रा; सार्वजनिक प्रसारण दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### बटर चिकन पाव

★ **साहित्य :-** बोनलेस चिकन, पाव, टोमॅटो प्युरी- एक मोठा चमचा, फ्रेश क्रीम किंवा मलाई- तीन टेबलस्पून, बटर-दोन टेबलस्पून, तेल- एक टीस्पून, कांदा बारीक चिरलेला- एक चमचा, लसूण-आले पेस्ट-एक टीस्पून, लाल मिरची पावडर- एक टीस्पून, गरम मसाला- अर्धा टीस्पून, कसुरी मेथी-एक टीस्पून, मीठ चवीप्रमाणे, कोथिंबीर, चीज-दोन टेबलस्पून.

★ **कृती :-** सर्वात आधी चिकन मॅरिनेट करा. आता त्यात दही दोन चमचे, लाल मिरची पावडर अर्धा टीस्पून, मीठ, लसूण-आले पेस्ट अर्धा टीस्पून घाला व चांगल्या प्रकारे मिक्स करा. कमीतकमी ५ मिनिटे ठेवा. आता नॉन-स्टिक पॅनमध्ये एक टीस्पून तेल गरम करा. मॅरिनेट केलेलं चिकन घाला आणि मध्यम आचेवर ४-५ मिनिटे दोन्ही बाजूंनी गोल्डन होईपर्यंत शिजवा. आता हे मिश्रण एका बाऊलमध्ये काढून घ्या. आता त्याच पॅनमध्ये एक टेबलस्पून बटर वितळवा. कांदा घाला व गोल्डन ब्राऊन होईपर्यंत परतवून घ्या. आता टोमॅटो प्युरी घाला आणि दोन मिनिटे परतवून घ्या. लाल मिरची पावडर, गरम मसाला, मीठ घालून हलवून घ्या. तसेच आता क्रीम घाला आणि काही मिनिटे मिक्स करा. तसेच शिजलेलं चिकन परत घाला व कसुरी मेथी क्रश करून टाका. आता दोन मिनिटे मंद आचेवर शिजू द्या. तसेच ग्रेव्ही थोडी घट्ट होईल. आता पाव मधून चिरा व बटर लावा. तव्यावर १ मिनिट प्रत्येक बाजू टोस्ट करा. यानंतर पाव उघडा. आत ग्रेव्ही व चिकन पीस भरा. वरून चीज आणि कोथिंबीर घाला. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही लिंबू पिळू शकतात. तयार बटर चिकन पाव नक्कीच सर्व्ह करा.



# भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका कसोटी शुक्रवारपासून

**भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना शुक्रवारपासून कोलकाता येथे सुरू होत आहे. आतापर्यंतच्या लढतींमध्ये दक्षिण आफ्रिका संघाची कामगिरी चांगली झाली असून, भारतीय संघही आत्मविश्वासाने या कसोटी मालिकेला सामोरे जाण्याची शक्यता आहे. या सामन्याच्या नाणेफेकीसाठी महात्मा गांधी व नेल्सन मंडेला यांचे चित्र असलेले विशेष नाणेही तयार करण्यात आले आहे.**



■ कोलकाता

भारतीय संघाची कसोटी क्रिकेट मधील कामगिरी चांगली राहिली आहे. इंग्लंडबरोबरची कसोटी मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवल्यानंतर भारताने वेस्ट इंडिजचा पराभव केला होता. तीच लय भारतीय संघ कायम ठेवेल अशी अपेक्षा आहे. भारत व दक्षिण आफ्रिकेत आतापर्यंत ४४ कसोटी सामने खेळले गेले असून, त्यातील आफ्रिकेने १८ तर भारताने १६ जिंकले आहेत. १० सामने अनिर्णित राहिले आहेत.

शुभमन गिल याच्या नेतृत्वाखालील भारतीय संघात ऋषभ पंत, यशस्वी जैस्वाल, के. एल. राहुल, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रित बुमराह, अक्षर पटेल, नितीशकुमार रेड्डी, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव व आकाशदीप यांचा समावेश आहे. दक्षिण आफ्रिका संघ तेम्बा बाबुमा याच्या नेतृत्वाखाली उतरणार असून, त्यांच्या संघात एडन मार्करम, रियान रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्ज, काईल वेरेल, डेवाल्ड ब्रेविस, जुबैर हमजा आदी खेळाडूंचा समावेश आहे.

भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी कोलकाता सज्ज झाले असून, बंगाल क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष सौरव गांगुली यांनी दक्षिण आफ्रिकेसाठी हा दौरा कठीण असेल असे म्हटले आहे. ते म्हणाले की, इडन गार्डनवर होणारा हा सामना दोन्ही संघांच्या चांगलाच लक्षात राहील. या सामन्यासाठीची खेळपट्टी तयार करण्यापासून ते इतर सर्व व्यवस्था चोख करण्यात आल्या आहेत. त्यासाठी आमचे ग्राऊंड स्टाफ अहोरात्र मेहनत करत आहेत. कोलकाताच्या प्रेक्षकांनाही चांगले क्रिकेट पाहायला मिळेल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

## गुहागर राज्य कॅरम स्पर्धेत सागर व समृद्धी विजेते

■ गुहागर

**गुहागरच्या** भंडारी हॉल मध्ये झालेल्या प्रदीप परचुरे व कॅरम लव्हर्स ग्रुप गुहागर आयोजित राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात पुण्याच्या सागर



वाघमारेने तर महिला एकेरीत ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकरने विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात सागरने ठाण्याच्या पंकज पवारवर २५-२१, २५-१९ अशी सहज मात करून या गटाचे विजेतेपद पटकावले. तर तिसऱ्या क्रमांकाच्या लढतीत मुंबईच्या विकास धारियाने मुंबईच्या निलांश चिपळूणकरला ७-२५, २५-१०, २५-१३ असे हरवले. महिला एकेरीच्या अंतिम फेरीत ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकरने रत्नागिरीच्या आकांक्षा कदमला रंगतदार लढतीत २१-२५, २४-५ व २२-२० असे हरवून या गटाचे विजेतेपद पटकावले. तर तिसरा क्रमांक प्राप्त करताना मुंबईच्या सोनाली कुमारीने मुंबईच्या रिंकी कुमारीला २५-१३, २५-११ असे हरवले. विजेत्या खेळाडूंना आयोजक प्रदीप परचुरे परिवार, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे मानद सचिव अरुण केदार, उपाध्यक्ष यतिन ठाकूर, खजिनदार अजित सावंत, सहसचिव केतन चिखले, रत्नागिरी डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप भाटकर, सचिव मिलिंद साप्ते यांच्या हस्ते रोख पारितोषिके, प्रमाणपत्र व चषक देऊन गौरविण्यात आले.

## हायसिंथ नाझरेथ स्मृती हॉकी स्पर्धा आजपासून

■ मुंबई

**युनायटेड** वांद्रे एससी आयोजित हायसिंथ नाझरेथ स्मृती हॉकी स्पर्धेची दुसरी फेरी उद्यापासून वांद्रे येथील सेंट अँड्र्यूज स्कूल ग्राऊंडवर खेळवली जाणार आहे. १४ आणि १६ वर्षांखालील मुले आणि मुली तसेच पुरुष आणि महिला खुल्या गटासह व्हेटरन्स अशा गटांमध्ये स्पर्धा होईल. या स्पर्धेत मुंबईतील संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून हायसिंथ नाझरेथ यांचा अनेक पिढ्यांचा वारसा जपतानाचा खेळाडूंकडून खेळण्याची भावना, सामुदायिक भावना आणि हॉकीची आवड जोपासत असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे.

## मुंबई उपनगर कबड्डी स्पर्धेमध्ये सिद्धार्थ व सिद्धिविनायक विजयी

■ मुंबई

**मुंबई** उपनगर कबड्डी असो.ने आयोजित केलेल्या ४३व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत सिद्धार्थ मंडळ व श्री सिद्धिविनायक मंडळ यांनी अनुक्रमे पूर्व व पश्चिम विभागात कुमार गटात विजेतेपद पटकाविले.

गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्ट्स अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने पार्ले येथील प्ले-ग्राऊंडवर हे सामने सुरू आहेत. पूर्व विभागातील कुमारांच्या अंतिम सामन्यात मुलुंडच्या सिद्धार्थ क्रीडा मंडळाने घाटकोपरच्या ओवाळी क्रीडा मंडळावर ३८-३३ असा विजय मिळवीत जेतेपदावर आपले नाव कोरले. पूर्वार्धात ११-१३ अशा पिछाडीवर पडलेल्या सिद्धार्थने सामना संपायला ५ मिनिटे असताना २७-२७ अशी बरोबरी साधली. नंतर अधिक आक्रमता दाखवीत ५ गुणांनी विजेतेपद आपल्याकडे खेचून आणले. पश्चिम विभागातील कुमारांच्या अंतिम सामन्यात दहिसरच्या श्री सिद्धिविनायक संघाने यजमान पार्ले महोत्सव स्पोर्ट्स अकॅडमीचा ५६-३१ असा पराभव करीत जेतेपदाला गवसणी घातली. ओम कुदळे, हर्ष गुरव, साहिल जाधव यांनी सुरुवातीपासून आक्रमक खेळावर जोर देत पहिल्या डावात सिद्धिविनायकने ३५-०८ अशी भक्कम आघाडी घेतली.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना**
**(द्रितीय मुदत वाढ)**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सांगली मंडल कार्यालयांतर्गत उच्चदाब विद्युत ग्राहकांसाठी वार्षिक ३३/११ केव्ही इनडोर / आउटडोअर मिटरींग सि. टी. / पि. टी. विद्युत संच पुरवठा बसवणे व कार्यान्वित करणे यासाठी मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून खालील प्रमाणे ई-निविदा मागवित आहोत.

| अ. क्र. | ई-निविदा क्रमांक | ई-निविदा रक्कम लाखात | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | SE/SC/T/T-06/2025-26 | रू.५०.०० | वार्षिक ३३/११ के. व्ही. इनडोअर/ आउटडोअर मिटरींग सि. टी./ पि. टी. विद्युत संच पुरवठा, बसवणे व कार्यान्वित करणे. |

सदर ई-निविदा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संकेत स्थळावर **https://etender.mahadiscom.in/eatApp/ दि. १२.०९.२०२५** पासून उपलब्ध आहे. निविदा सादर करणेची अंतीम तारिख **१९.११.२०२५ रोजी २३.५५** वाजे पर्यंत आहे.
संपर्क – कार्यकारी अभियंता (प्रशासन), महावितरण मंडल कार्यालय, सांगली दुरध्वनी व मोबाईल क्र.– ७८७५७६९०१२

सही/-
**P.R.O/KOPZ/192/2025-26** अधिक्षक अभियंता, मंडल कार्यालय, सांगली

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

**ई-निविदा सुचना क्र. /३६/२०२५ साठी शुद्धीपत्रक**

दिनांक ११/११/२०२५ रोजी दै. नवाकाळ, मुंबई (राज्यस्तरीय) वृत्तपत्रात निविदा सुचना क्र. ३६ सन २०२५ अंतर्गत काम क्र. क (१) (रांजणगाव) निविदा याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त निविदा सूचनेमधील इतर बाबींमध्ये (कामांमध्ये) कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**जाहीर सूचना**
*(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)*

**कॉर्पोरेट ऋणको मे. कुशन नंदी आणि किरण श्रॉफ पिक्चर्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार, कु. रिना मुमताझ यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | मे. कुशन नंदी आणि किरण श्रॉफ पिक्चर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या हमीच्या कंत्राटामध्ये जामीनदार असलेल्या, कॉर्पोरेट ऋणकोच्या वैयक्तिक जामीनदार (पीजी) चे नाव | कु. रिना मुमताझ |
| २ | पीजीच्या निवासाचा पत्ता | सदनिका क्र. १२०३, १२ वा मजला, रहेजा क्लासिक बिल्डींग क्र. ७, इन्फिनिटी मॉलजवळ, न्यू लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०००५३. |
| ३ | निर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाचा तपशील | सीपी(आयबी) १६७/२०२४ दिनांक ०७.११.२०२५ नुसार मे. कुशन नंदी आणि किरण श्रॉफ पिक्चर्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार, कु. रिना मुमताझ यांच्या विरुद्ध दिवाळखोरी ठराव माननीय एनसीएलटीने स्वीकारला आहे. |
| ४ | आयबीसी, २०१६ अंतर्गत पीजीच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | दि. ०७.११.२०२५ |
| ५ | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | आक्रिती सूद IBBI/IPA-002/IP-N01224/2022-2023/14221 |
| ६ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | १ए, संस्कृती अपार्टमेन्ट, जीएच-२२, सेक्टर-५६, गुरूग्राम-१२२०११. ईमेलः contactaakritisood@gmail.com |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | १ए, संस्कृती अपार्टमेन्ट, जीएच-२२, सेक्टर-५६, गुरूग्राम-१२२०११. ईमेलः rp.knnkspictures@gmail.com |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०२.१२.२०२५ |
| ९ | संबंधित अर्ज येथे उपलब्धः | (अ) भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट ऋणकोच्या वैयक्तिक जामीनदारांकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१९च्या विनियमन ७(१) अन्वये फॉर्म बी (बी) वेब लिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ** यांनी दिनांक ०७.११.२०२५ च्या आदेशानुसार, कु. रिना मुमताझ यांची वैयक्तिक दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. कु. रिना मुमताझ (मे. कुशन नंदी आणि किरण श्रॉफ पिक्चर्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०२.१२.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिकांना नोंद क्र. ०८ मध्ये उल्लेखित पत्त्यावर सादर करावे.
कु. रिना मुमताझ यांच्या धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह एकतर इलेक्ट्रॉनिक संपर्काद्वारे किंवा कुरियर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पत्राद्वारे पाठवावे.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

आक्रिती सूद
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-002/IP-N01224/2022-2023/14221
एएफए वैधता दि. ०३.०६.२०२६ पर्यंत

दिनांकः ११.११.२०२५
ठिकाणः मुंबई

**फॉर्म जी**
**मुंबई, महाराष्ट्र येथे गुंतवणूक कंपनी म्हणून कार्यरत**
**फ्यूचर कॉर्पोरेट रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड**
**करिता स्वारस्य अभिव्यक्तींचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व त्यासह पॅन क्र. | फ्यूचर कॉर्पोरेट रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड सीआयएनः U74140MH2007PTC175603 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | तळमजला, दुकान क्र. १, लक्ष्मी नारायण स्टेशनरी, प्रेम नगर, मेघवाडीसमोर, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई ४०००६०, महाराष्ट्र. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | - |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | ही कंपनी समूह गुंतवणूक कंपनी म्हणून कार्यरत होती आणि लॉयल्टी प्रोग्राम, मीडिया रिलीझ आणि टेलिकॉम टॉक-टाइम यासारख्या व्यावसायिक उपक्रमांमध्ये देखील गुंतलेली होती. अधिक तपशिलाकरिता irp.fcrpl@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कंपनी कार्यरत नाही. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे परिमाण आणि मूल्य | शून्य |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शून्य |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, प्रक्रियेच्या पुढील घटनांकरिता संबंधित दिनांक समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएल | भारतीय दिवाळखोरी आणि दिवाळखोरी मंडळाच्या (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए आणि विनियमन ३६बी(६ए) नुसार कॉर्पोरेट कर्जदाराच्या वगळलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त सर्व मालमत्तेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रित करण्यात येत आहे. अधिक तपशिलाकरिता irp.fcrpl@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएलः | ठराव व्यावसायिक नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २९ए अन्वये पात्र असावेत. तपशिलवार ईओआय आणि पात्रता निकषांकरिता, irp.fcrpl@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | ०३ डिसेंबर, २०२५ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | ०६ डिसेंबर, २०२५ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | ११ डिसेंबर, २०२५ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | १३ डिसेंबर, २०२५ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | १३ डिसेंबर, २०२५ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | १२ जानेवारी, २०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याकरिता प्रक्रिया ईमेल आयडी | irp.fcrpl@aegisipe.com |

दिनांकः १२ नोव्हेंबर, २०२५
ठिकाणः मुंबई

सही/-
एजिस रिझोल्यूशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
फ्यूचर कॉर्पोरेट रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेडचे ठराव व्यावसायिक म्हणून
प्राधिकृत स्वाक्षरीकार अविल मेनेझेस यांच्या द्वारे
नोंदणी क्र. IBBI/IPE-0118/IPA-1/2022-23/50041
अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता दि. ३० जून, २०२६ पर्यंत वैध
पत्ताः १०६, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड 'ए',
चकाला एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३.
ईमेलः irp.fcrpl@aegisipe.com, avil@caavil.com